## प्रकरण दुसरे

## श्री. नाना पाटील यांचे चरित्र

## प्रकरण दुसरे

## श्री. नाना पाटील यांचे चरित्र

### प्रस्तावना -

भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा अखेरचा टप्पा १९४२ चा लढा होता. कारण १८५७ ते १९४७ या कालखंडातील हा महत्त्वाचा स्वातंत्र्यलढा होय. संपूर्ण देशात लोकांनी चळवळी करुन प्रतिसरकारे स्थापन केली. भागलपूर, मिदनापूर, बालिया आणि सातारा येथे क्रांतिकारकांनी फार मोठा लढा दिला. याचे नेतृत्त्व श्री. नाना पाटील यांनी केले होते.

श्री. नाना पाटील यांच्या नेतृत्त्वात अनुवंशातेचा व परंपरेचा भाग जवळजवळ नव्हताच. सामाजिक परिस्थितीवर मात करुन लोकांच्यामधून त्यांचे नेतृत्त्व उदयास आले. छत्रपती शिवाजी महाराजांच्यापासून स्फूर्ती घेऊन स्वातंत्र्य चळवळीत क्रांतिकारकांनी कार्य केले. सर्वसामान्य माणसांच्या हिताच्या-दृष्टीने साताऱ्यात अनेक चळवळी झाल्या. त्यामध्ये सत्त्यशोधक चळवळ, ब्राह्मणेतर चळवळ, स्वातंत्र्याची चळवळ या चळवळी महत्त्वाच्या आहेत.

प्रथम सत्त्यशोधक चळवळीत आणि नंतर स्वातंत्र्यचळवळीत नाना पाटील यांनी शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी प्रयत्न केले. त्यामुळे राष्ट्रीय चळवळीस जोर चढला. हे नाना पाटील यांचे एकट्याचे चरित्र नसून साताऱ्यातील लोकांनी चालविलेल्या लढ्याचे चरित्र आहे. कारण इतिहास सर्व समाजाकडून घडविला जातो. नाना पाटील या समाजाचे प्रतिनिधी होते. सर्वसामान्य शेतकऱ्यांचे प्रश्न त्यांनी हाताळले.

### जन्म -

श्री. नाना पाटील यांचा जन्म सातारा जिल्ह्यात (द.सातारा - आजचा सांगली) वाळवा तालुक्यात बहे (बोरगांव) येथे त्यांच्या आजोळी

३ ऑगस्ट १९०० साली झाला. आईचे नांव गोजराबाई व वडिलांचे नांव रामचंद्र होते. मूळगांव येडे मच्छिंद्र हे वाळवा तालुक्यातच आहे. गांव आणि आजोळ यामध्ये फक्त दोन मैलाचे अंतर आहे. "जन्माला येऊन बारा दिवस झाले तोच त्यांच्या वडिलांनी नानांच्या गळ्यात पंढरपूरच्या पांडुरंगाची माळ घातली. कारण नानांचे घराणे वारकरी होते." [१]

बालपण -

बालपणी नाना अत्यंत खोडकर होते. निवांतपणा आणि शांतता त्यांच्या स्वभावात नव्हता. आईवडीलांनी त्यांना शाळेत पाठवले. शाळेतही नानांनी आपल्या स्वभावचा ठसा उमटविला. आंघोळ करणे, तालमीत जाणे, कुस्त्या करणे, फड जिंकणे हा नानांचा स्वभावच बनला होता.

शिक्षण -

येडेमच्छिंद्र येथे तिसरीपर्यंत शाळा शिकले. त्यानंतर चौथीला जवळच नरसिंगपूरला ते जाऊ लागले. यानंतर रामपुरीबुवाबरोबर नानांना पुणंदी या गावी पाठवले. तेथून दुधोंडीच्या शाळेत नाना जाऊ लागले आणि घरी धार्मिक अभ्यास करीत होते. "पांडवप्रताप, हरिविजय, रामविजय, कृष्णालीलामृत, पंचरत्नगीता इत्यादी सर्व ग्रंथ रामपुरी बुवांच्या देखरेखीखाली नानांनी वाचून काढले. बुवांनी काही गाणी, अभंग, भजने नानांकडून पाठ करुन घेतली. नाना रोज पुणंदीहून शाळेला अडीच मैल चालत जाऊन परत येत होते. पण यामध्ये खंड पडू लागला. त्यामुळे पुढील शिक्षण खोताचीवाडी येथे राहून "नागराळे" या गांवी झाले. तेथे चार वर्षे शिक्षण घेऊन नाना "व्हर्न्याक्यूलर फायनल" परीक्षा इ.स. १९१८ साली पास झाले." [२]

आपल्या गावीच तलाठ्याच्या हाताखाली त्यांनी कामास सुरुवात केली. तलाठ्याबरोबर काम करणे आणि तालीम व आराखडा असा कार्यक्रम सुरु झाला.

या दरम्यान साता-यात सत्यशोधक चळवळ पसरत होती. कोल्हापूरच्या छत्रपती शाहू महाराजांनी आश्रय दिल्यामुळे सत्यशोधक चळवळीचा प्रसार व प्रचार चांगलाच झाला. सांगली-सातारा-कोल्हापूर या परिसरात चळवळ फोफावली. प्रचाराचे साधन म्हणजे जलसा होते. याचा प्रचंड प्रभाव नाना पाटील यांच्यावर झाला. सत्यशोधक समाजाच्याचळवळीचा नानावर प्रभाव पडला. कारण "सत्तशोधक चळवळ म्हणजे नुसता ब्राम्हणावर द्वेषपूर्वक हल्ला होता. असे नव्हे, तर शेट-सावकार - वकिलाविरुध्द कर्ज दलालीविरुध्द, दारुडांच्या-भांग-वेश्याबाजी या शेतक-यांच्या व्यसनाविरुध्द मर्तिके, ब्राम्हण-भोजने, लग्नसराई यांत उधळणा-या पैशाविरुध्द म्हणजे बहुजनसमाजाच्या अज्ञानावर, दारिद्र्यावर, दुष्ट-रुढी अशिक्षितपणावर ढोंगी धार्मिकतेवर तो खरा हल्ला होता आणि या सर्वांच्या आड येणारा भटजीवर्ग आहे. त्यामुळे त्या वर्गावर त्यांचा सर्वात जास्त कटाक्ष होता." [3]

महाराष्ट्रातील अज्ञानी व दरिद्री आणि आळसी समाजाला सत्त्य-शोधक चळवळीमुळे शक्ती आली. या चळवळीत भाग घेण्याचे नाना पाटील यांनी ठरविले आणि चळवळीत ते काम करु लागले.

थोर समाजसुधारक महात्मा फुले यांनी "शेतक-यांचा आसूड" या पुस्तकात शेतक-यांची दु:खे मांडली होती. त्यामुळे सत्त्यशोधक चळवळीस गती मिळाली. ही चळवळ शेतक-यांची चळवळ झाली. याच चळवळीला कोल्हापूरचा राजाश्रय लाभल्यामुळे चळवळीची पाळेमुळे खोलवर गेली आणि सातारा हे या चळवळीचे मुख्य केंद्र बनले.

"सत्त्यशोधक चळवळीत हजारो तरुण स्वयंस्फूर्तीने सामील झाले होते. नानाही या चळवळीत आले होते. खुद्द स्वत: नाना पाटील पुरोहितांचे काम करीत होते. थोड्या खर्चात लग्ने लावीत होते. नानांनी स्वत:च्या बहिणीचे

लग्न १९३४ साली कमी खर्चात सत्यशोधकीपध्दतीने नाथाजी लाड यांच्याशी लावले. समाजातील रुढी, परंपरा, अज्ञान, दारिद्र्य दूर करण्यासाठी नानांनी आटोकाट प्रयत्न केला. [४]

तलाठी : नाना पाटील

व्हर्न्याक्यूलर फायनल पास झालेल्या तरुणाला खेडेगावी हक्काची नोकरी तलाठ्याची होती ती नानांना मिळाली. नोकरी मिळाली तरी कुस्त्यांचे फडावर नाना जात होतेच.

"१९२० साली सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यातील सजा सुरली येथे नानांची तलाठी म्हणून नेमणूक झाली होती. तलाठी झाल्यानंतर नानांचे लग्न झाले. नानांनी स्वतःच मंगलअष्टका म्हणून स्वतःचे लग्न सत्यशोधकीपध्दतीने कमी खर्चात केले. १९२२ साली वाठारसजा या गांवी अचानक नानांची बदली झाली. सरकारचा शेतसारा योग्यवेळी न भरल्यामुळे नानांच्यावर आरोप केले होते. त्यांना ताबडतोब नोकरीवरुन कमी केले." [५]

तलाठ्याच्या कामावरुन नाना पाटील मुक्त झाल्यावर त्यांनी सार्वजनिक जीवनात भाग घ्यावयास सुरुवात केली. हळू हळू ते राष्ट्रीय चळवळीकडे ओढले गेले. १९३० साली कर्मवीर वि.रा. शिंदे यांच्या प्रयत्नामुळे अनेक ब्राह्मणेत्तर नेते कॉंग्रेसमध्ये सामील झाले. त्यात नाना पाटील ही होते

सत्याग्रही नाना -

सन १९३० सालामध्ये म. गांधींनी कायदेभंगाची चळवळ सुरु केली. नानांनी या सत्याग्रहात भाग घेतला. नानांचे सहकारीही या सत्याग्रहात सहभागी झाले होते. देशातील सर्व रोगाचे मूळ इंग्रजांची राजनीती आहे, म्हणून याला प्रत्येक भारतीयांनी प्रतिकार केला पाहिजे असे नानांचे मत होते.

सत्यशोधकी नाना सत्याग्रही बनले. याचवेळी महाराष्ट्रातील सत्यशोधकी पुढारी श्री. केशवराव जेधे यांनी बहुजनसमाजाला आवाहन केले. त्यामुळे सर्व महाराष्ट्रातील बहुजन समाज राष्ट्रीय चळवळीत सहभागी झाले. अज्ञान, दारिद्र्य, दुष्काळ, रोगराई, भेदाभेद यांच्या आड इंग्रजशाही आहे हे सर्वांनी ओळखले होते.

"नानांनी एका काठीला तिरंगाध्वज लावून खेड्यापाड्यातील चावडीसमोर राष्ट्रीयचळवळीचा प्रचार केला. खेड्यातील सर्व लहान थोर मंडळी नानांचे विचार ऐकाला जमत. रात्री-अपरात्रीही खेड्यात नानांनी सभा घेतल्या असा हा स्वराज्याचा प्रचार इंग्रज सरकारला आवडला नाही. त्यामुळे नानांच्यावर सरकारने पकड वॉरंट काढले. परंतु शिरोड्याच्या सत्याग्रहासाठी नाना हजर झाले. तेथून ते सावंतवाडी, बेळगांव, पंढरपूर आणि मुंबई येथील कार्यक्रमास नाना हजर होते." [६]

"नाना गावी आले तरी ते शांत बसले नाहीत. त्यांच्यांवर पकडवॉरंट होतेच. पूर्वीच्या तलाठी प्रकरणातील धागेदोरे सरकार दप्तरी शिल्लक होतेच. त्यामुळे नाना प्रचार दौऱ्यावर असतानाच त्यांच्या घरादाराचे लिलाव पुकारले गेले. परंतु गावातील व परिसरातील लोक लिलाव बोलण्यास पुढे कोणी आले नाही." [७] त्यानंतर त्यांनी जंगलसत्याग्रह, वैयक्तिक सत्याग्रह या चळवळीत भाग घेतला.

राष्ट्रीय चळवळीचा नाना प्रचार करीत फिरत होते. त्यावेळी मिळेल ते खायचे, असेल तसे राहायचे आणि सर्वसामान्य शेतकरी जागा करण्याचे काम करायचे असे नानांचे धोरण होते. त्यांनी सातारा जिल्ह्यात जागृती पसरवली. त्यानंतर पुणे, रत्नागिरी, कोल्हापूर, सांगली, मिरज, बेळगांव, सोलापूर या ठिकाणीही त्यांनी भाषणे केली व इंग्रजाविरुद्ध जनमत जागृत केले.

या परिस्थितीत राष्ट्रीय चळवळीच्या धामधुमित नानांच्या पत्नीचे निधन झाले. घरात वयस्कर वडील, आई आणि तीन चार वर्षांची नानांची एक मुलगी व आजी होती. गावातील कॉलराच्या साथीने आणि काळजीने वडील थकले होते. एक दिवस वडील या साथीला बळी पडले. वडीलांच्या अत्यंविधीला नाना आले होते. पोलिसांना चुकवून विधी आटोपला आणि ते आपल्या समाजकार्यासाठी मुक्त झाले.

७ मार्च १९३१ साली गांधी-आयर्विन करार घडवून आला. या करारा-न्वये सर्व राजकीय कैद्यांची बिनशर्त सुटका झाली. राजकीय कैदी सुटले, तसेच राजकीय आणि भूमिगत पुढा-यांच्यावरील पकड वॉरंटेही रद्द झाली. पण "नानांच्यावर तलाठी प्रकरणातील ठपका होता. त्याचा कायदेशीर खटला होऊन नानांना शंभर रुपये दंड अधिक सश्रम सहा महिने कारावासाची सजा ठोठावण्यांत आली." [८]

राजकीय कैदी -

सहा महिन्यांची शिक्षा भोगून नाना सुटून आले तरी ते स्वस्थ बसले नाहीत. पुढे काय करायचे याबाबत विचार सुरु होता. घरी कुटुंबातील माणसे वडील, पत्नी, आजी यांचे निधन झाले होते. आता फक्त वयस्कर आई आणि लहान मुलगी राहिली होती. एकटाच आधार होता. गोलमेज परिषदेच्या अपयशानंतर पुन: कॉंग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांची धरपकड झाली. पण त्यामुळे कॉंग्रेसची चळवळ मोडकळीस आली नाही. सरकारच्या या दडपशाहीमुळे जनतेमध्ये असंतोष वाढला. कॉंग्रेसची शक्ती वाढली. नानांना पकडण्यात आले. "इस्लामपूरला त्यांची रवानगी झाली. नानांची पॅरोलवर सुटका झाली. परंतु नानांनी ते सर्व नियम धाब्यावर बसविले. आणि नियमांचा भंग केला. त्यामुळे सहा महिन्यांची कारावासाची शिक्षा देण्यात आली. त्यांनी हे दिवस आनंदाने घालविले. नानांनी शिक्षा संपवून पुन्हा राष्ट्रीय चळवळीच्या प्रचारास सुरुवात केली." [९]

१९३४-३५ च्या आसपास काँग्रेसची चळवळ कमजोर झाली. १९३५ साली भारत सरकारचा नवा कायदा संमत झाला. या कायद्यानुसार राज्यांना काही प्रमाणात स्वायत्तता देण्यात आली होती. मतदारांचे प्रमाणही वाढले होते. १९३५ च्या कायद्याप्रमाणे राज्यांच्या कायदेमंडळासाठीच्या निवडणुका १८३७ साली घेण्यात आल्या. काँग्रेसने या निवडणुका लढविल्या.

कायदेमंडळाच्या निवडणुका -

नव्या कायदेमंडळाच्या निवडणुका जाहिर झाल्या होत्या. काँग्रेसने निवडणुका लढविण्याची जोरदारपणे खटपट सुरु केली होती. श्री नाना पाटील यावेळी निवडणुकीच्या प्रचारात अग्रेसर होते. नानांनी काँग्रेसचा प्रचार जोरदारपणे केला. सातारा जिल्ह्यांत दौरा, मिरवणुका, परिषदा, यांचा नुसता धुमधडाका उडवून दिला. त्यामुळे काँग्रेसला मोठे यश मिळाले. काँग्रेसने देशात आठ प्रांतात अपूर्व यश मिळविले. १९३७ साली काँग्रेसने आपले मंत्रिमंडळ बनवले. साक्षरता प्रसार, शिक्षण, दारुबंदी वगैरे लोकोपयोगी कामे काँग्रेस सरकारने हाती घेतली.

यावेळी सरकारने कांहीना काही कारण काढून नानांना अटक केली ही शिक्षा संपून नाना बाहेर पडतात. तोच त्यांना कोल्हापूर दरबारने अटक करुन बेमुदत तुरुंगात डांबले. संस्थानातील काही लोकांनी याचा निषेध केला. नानांच्या सुटकेसंबंधी दरबारकडे मध्यस्थी सुरु केली. अखेर नानांची बिनशर्त सुटका केली.

वैयक्तिक सत्त्याग्रह -

दुसरे महायुध्द सुरु झाले. इंग्राज सरकारशी मतभेद होऊन काँग्रेस सरकारांनी राजीनामा दिला आणि म. गांधीनी वैयक्तिक सत्त्याग्रहाची चळवळ सुरु केली.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY. KOLHAPUR

SHIVAJI UNIVERSITY
LIBRARY
KOLHAPUR

१९४० साली वैयक्तिक सत्त्याग्रहाची चळवळ गांधीजीनी सुरु केली. दुसऱ्या महायुध्दात भारतीय जनतेने इंग्रज सरकारच्या युध्दकार्याला मदत करु नये. युध्दविरोधी प्रचार करावा हा चळवळीचा उद्देश होता.

"१९४० च्या अखेरिस बहे (बोरगांव) ता. वाळवा या आपल्या आजोळी आणि सप्टेंबर १९४१ मध्ये आपल्या मुलीच्या गांवी हणमंतवडिये, ता. खानापूर येथे नाना पाटलांनी वैयक्तिक सत्त्याग्रह केला." [१०] त्यांनी दोन वेळा वैयक्तिक सत्त्याग्रह केला. पण इंग्रज सरकार वटत नाही म्हणून म. गांधीनी चलेजावचे रणशिंग फुंकले.

अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीने ८ ऑगस्ट १९४२ रोजी "चलेजाव" चा ठराव पास केला. उघड क्रांती जाहिर केली. सर्व देश घोषणेखाली आला होता. "करेंगे या मरेंगे या आरोळ्या देशभर उठल्या. इंग्रजांना हिंदुस्थानातून हाकलून द्यायची सर्वांनी प्रतिज्ञाच केली. सातारा जिल्हा या बाबतीत आघाडीवर राहिला. आणि यावेळेपासून नानांच्या क्रांतिकारक जीवनाचा दुसरा टप्पा सुरु झाला.

सातारा जिल्ह्यांत १९४२ च्या ऑगस्ट क्रांतीत अनेक घडामोडी घडल्या. सरकारने अनेक कार्यकर्त्यांची धरपकड केली. सरकारला शरण जायचे नाना पाटील यांनी नाकारले. आणि ते भूमिगत झाले. सातारा जिल्हा ब्रिटिश सरकारशी शर्थीने लढून शक्य तेवढा प्रतिकार करीत होता. सरकारी जुलमा-विरुध्द जनतेचे संघटितपणे मोर्चे काढावयाची नवी चळवळ नानांनी सुरु केली. त्यावेळी नानांनी अनेक गावांना भेटी दिल्या. अनेक मोर्चे काढले. "तासगांव येथील स्फूर्तिदायी मोर्चा दोन सप्टेंबर १९४२ तर इस्लामपूर येथील मोर्चा ८ सप्टेंबर १९४२ आणि वडूज, ता. खटाव येथील मार्चा नउ सप्टेंबर १९४२ रोजी निघाला होता." [११] मोर्चाच्या ठीकाणी पोलीसांनी राक्षसी गोळी-बार केला. एकावेळी एका ठिकाणी एका दिलाने काढलेला अडीच-तीन

हजारांचा जनसमुदाय जमला होता. जनता पारतंत्र्यातील जीवनाला कंटाळलेली आणि जुलमी कायद्यांनी वैतागलेली होती. हे पाहून जनतेने उग्र स्वरूप धारण केले होते. हे सर्व अत्याचार पाहून नानांनी भूमिगत सशस्त्र लढा करण्याचे ठरविले.

राक्षसी सरकारच्या या पाशवी अत्याचारांचा संघशक्तीने पुरा नायनाट केल्याशिवाय गत्यंतर नाही. अशी नानांना खात्री पटली आणि त्या दिशेने त्यांचे कार्य सुरु झाले. भूमिगतांचे कार्य व्यवस्थित व्हावे म्हणून कार्यकर्त्यांची संघवार विभागणी करून संघाचे नेते ठरवून दिले आणि कुंडल संघाचे नेतृत्व खुद्द नाना पाटील यांनी स्विकारले होते. तासगांव, इस्लामपूर, वडूज प्रमाणे क-हाड पाटण कचेरीवरही मोर्चे नेले होते. मोर्चावर लाठीहल्ला व गोळीबारही केला. कित्येक निरपराध लोकांस निष्कारण तुरुंगात खितपत पडावे लागले. नानांचे कार्य भूमिगत राहूनही जोरांत सुरु होते. ऑगष्ट क्रांतीमुळे नानांना अनेक जिवलग सहकारी लाभले. त्यामुळे त्यांच्या कार्याला विशेष बळकटी आली. नवे नवे सहकारी, नव्या कल्पना, नव्या योजना, नवे मार्ग आणि ते मार्ग हाताळण्यासाठी नवी हत्यारेही त्यांना निवडावी लागली. नानांच्या या कार्यात मोठ्या प्रेमाने, धैर्याने आणि स्वयंस्फुर्तीने भाग घेणारे अनेक कार्यकर्ते मिळाले. त्यामध्ये नाथाजी लाड, भगवानराव मोरे, पांडू मास्तर निवृत्ती कळके, जी.डी. लाड, नागनाथ नायकवडी, बर्डे मास्तर, रामभाऊ पवार, श्रीमती सावंत, काशिनाथ देशमुख अप्पासाहेब लाड, तांबटकाका, डॉ.उत्तमराव पाटील, पांडूरंग बोराटे, बाबूराव चरणाकर, शेखकाका, बाबुजी पाटणाकर, शाहिर शंकरराव निकम, सौ. लिलाबाई पाटील, सौ. विजया लाड, सौ. लक्ष्मीबाई नायकवडी, सौ. हौशाताई मोरे, सौ. राजमती बिरनाळे इत्यादींनी नानांना विशेष मदत केली. "या सर्व मंडळीनी एकोटयाने एक मताने आणि एकत्र सहकार्याने राहून क्रांतीची सूत्रे हाती घेतली व सातारा जिल्ह्यात ग्रामराज्याची स्थापना केली." [११]

## सातारा प्रतिसरकार -

९ ऑगस्ट १९४२ पासून सरकारी दडपशाहीला जोर आला होता. परंतु जनतेत स्वयंस्फूर्तीने झालेली क्रांती थांबणार नाही. जनतेचे नेतृत्त्व नवनवीन कार्यकर्त्यांनी पुढे येऊन केले. ब्रिटिशांची यंत्रणा खिळखिळी केली. आणि त्याजागी लोकराज्य यंत्रणा सुरु करुन नवी राजवट प्रस्थापित करण्याचा प्रयत्न संघटित स्वरुपात सुरु केला. जनतेचे प्रातिनिधीक प्रतिसत्ता निर्माण करुन ती कायम टिकविण्यासाठी शिकस्तीचे प्रयत्न केले.

लोकांच्या विश्वासातील क्रांतिकारी नेत्यांनी जबाबदारीने चालविलेले प्रतिसरकार निर्माण केले व ते जनतेच्या सुखासाठी चालवले. या प्रतिसरकारने प्रथम आपले लक्ष खेडयाकडे वळविले. प्रत्येक गांवा-गांवामध्ये "जनतेचे राज्य" स्थापन केले, यालाच "ग्रामराज्य" म्हणाता येईल. संघटित ग्रामराज्ये हा सातारा जिल्ह्यांतील चळवळीचा विशेष होता. म. गांधींच्या विधायक कार्यक्रमाचे उद्दिष्ट जनतासंघटन, विशेषत: खेड्यातील संघटना हेच आहे. त्यासाठी खादी, हरिजन सेवा, जातीय ऐक्य, ग्रामोद्योग इत्यादी साधनांचा ते उपयोग करु लागले. सातारा जिल्ह्यांतील ग्रामराज्याच्या कार्यक्रमात प्रथमपासूनच संघशक्तीचाच अंतर्भाव झालेला असल्यामुळे जनतेला ग्रामराज्याबद्दल प्रेम वाटू लागले. ग्रामराज्यांचा कार्यक्रम खालील प्रमाणे होता, "न्यायदान, सैनिक व घटना, कर्ज निवारण, दारुबंदी, जमीनदारी व सावकारी बाबतचे प्रश्न, अन्नपाणी, कपडा, आरोग्य, शिक्षण, समाजाचे नैतिक पुनर्घटनांचे प्रश्न, जातियतेला मुठमाती." [१२] ही बारा कलमी योजना ग्रामराज्यांची योजना होती. सातारा जिल्ह्यांत दारुबंदी, साक्षरता प्रसार त्याचबरोबर झटपट न्यायदानपध्दती सुरु केली. कमी खर्चात लोकांना न्याय मिळू लागला. गांवांतील गैरव्यवहार बंद झाले. गांवागांवामध्ये जागृती होऊन जनतेला नवीदृष्टी प्राप्त झाली. प्रत्येक गोष्टीला राष्ट्रीय स्वरुप येऊ लागले. स्वातंत्र्य या शब्दाचा अर्थ आणि आनंद लोकांना मिळू लागला. सातारा जिल्ह्यातील

ही स्वयंस्फूर्तीची क्रांती समर्थ आणि संघटित अशीच होती. लोकराज्य निर्माण करण्याचा हा अभिनव प्रयोग सातारा जिल्ह्यात यशस्वी झाला. हिंदी स्वातंत्र्यप्राप्तीचा अंतिम मार्ग सातारा क्रांतीने हा प्रयोग करून दाखवून दिला. याचवेळी कॉंग्रेसच्या नावांवर कांही गुंडांनी धुमाकूळ मांडला. त्यांचा वेळीच नायनाट करून यांच्याशी आपला कांहीही संबंध नाही असे नाना पाटील यांनी जाहिर केले.

भूमिगत नाना पाटील -

येडेमच्छिंद्र गावचे वारकरी नाना पाटील १९४२ च्या चळवळीने धारकरी बनले होते. सत्यशोधक नाना जसे गांधीवादी राष्ट्रभक्त झाले, तसे ते ४२ च्या लढयात सशस्त्र लढयाचे प्रणेते बनले. त्याचे कारण नानांच्या लढयाचे तंत्र एकच असे ठरलेले नव्हते. इंग्रजांशी लढताना जेव्हा गांधीवादी तत्त्वज्ञान निरुपयोगी आहे असे त्यांना वाटले. तेव्हा त्यांनी सशस्त्र क्रांतीचा मार्ग स्विकारला.

भूमीगत नानांचे जीवन म्हणजे एखाद्या अद्भूत कादंबरीचा विषय ठरावा असे होते. पूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांच्या विषयी स्वकीय व परकीय लोकांत जशा अद्भूत दंतकथा प्रसारित झाल्या होत्या. तशा नानांच्या भूमीगत अवस्थेतील कामगिरीबद्दल प्रसृत झाल्या होत्या. तशी उद्भूत कामगिरी नाना पाटील यांनी करून दाखविली होती. ४२च्या लढ्यात सतत ४४ महिने ते भूमिगत राहिले. पोलिसांनी जंगजंग पछाडले. पाच हजारांचे इनाम जाहिर केले. वारंट काढले, साताऱ्च्या गिलबर्ट (डी.एस्.पी.) ने आकाश-पाताळ एक केले. तरी नाना पाटील सापडले नाहीत. छ. शिवाजी राजा-प्रमाणे अनेक युक्त्या करून त्यांनी शत्रूला चकविले. कित्येक वेळा पोलिस अगदी त्यांच्याजवळ पोहचत पण प्रत्येकवेळी ते त्यांना गुंगारा देण्यात यशस्वी झाले.

भूमिगत अवस्थेतही कार्यकर्त्यांच्या शिबीरांना ते मार्गदर्शन करीत होते. एवढेच नव्हे तर त्यांच्या जाहीर सभा होत होत्या. नाना पाटील यांची सभा आज येथे तर उद्या २५ मैलावर तर परवा आणखी २५ मैलावर कुठे तरी असायची. शेवटपर्यंत पोलिसांना नाना पाटील सापडले नाहीत.

श्री. नाना पाटील या प्रदीर्घ भूमिगत अवस्थेत पोलिसांच्या हाती पडले नाहीत. याचे श्रेय त्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेणा-या त्यांच्या सहका-यांना आहेच पण त्याहीपेक्षा अधिक सर्वसामान्य जनतेला आहे. लोकांना वाटत होते. नाना पाटील आपल्या घरचाच माणूस आहे. अगदी शेतक-यापासून वडरापर्यंत सर्वांची त्यांच्याबद्दल ही आपुलकीची भावना होती.

भूमिगत नाना पाटील हे साताऱच्या प्रतिसरकार चळवळी प्रतीक होते. यशवंतराव चव्हाण या संबंधी असे म्हणाले की, "सातारा येथील चळवळीचे नांव देशात सर्व ठिकाणी पोहचले ते नाना पाटील यांच्यामुळेच." [१३] देशात आणि परदेशात इंग्लडच्या संसदेमध्ये सातारा प्रतिसरकारचे आणि नाना पाटलांचे पडसाद उमटलेले होते. अगदी काशीच्या पंड्याची फजीती उडाली होती. भोळ्या भाबड्या यात्रेकरूंना लुबाडण्याचा धंदा करणा-या पंड्यास दक्षिणा देताना साताऱच्या एका कार्यकर्त्याने नाना पाटलांचे नांव सांगताच त्याने दक्षिणा तर घेतली नाहीच पण, "नाना पाटलांस काशीच्या पंड्याचा नमस्कार सांगा" असे विनविण्याची त्याच्यावर पाळी आली.

चळवळ नानांच्या नावाने चालली होती आणि म्हणूनच ते कोणत्याही परिस्थितीत पोलिसांच्या हाती लागता उपयोगी नव्हते. कारण त्यामुळे चळवळीचा आधारच नष्ट झाला असता. आणि जनसामान्यांचे नीतीधैर्य नष्ट झाले असते. त्यामुळेच ऐन चळवळीत नानांना कित्येक महिने अत्यंत गुप्तपणे रहावे लागले होते. अशा परिस्थितीत नाना पाटील यांनी आपल्या जवळच्या सहका-यांना अशी विनंती आणि ताकिद दिली होती की, "या काळात मला मृत्यू आला तर तो जाहिर न करता गुप्तपणे पुरून टाकावे." [१४]

मुंबई येथील कामगार वस्तीतील कार्य -

कामगार-शेतकरी-मजूर यांच्या स्वातंत्र्याचे प्रश्न इतर भारतीयांच्या-पेक्षा काहीसे वेगळे व मुलगामी स्वरूपाच्या स्वातंत्र्याचे होते. जमीनदार वतनदार-सावकार-गिरणीमालक नफेखोर बनिया आणि गावगुंड यांच्यापेक्षा शेतकरी व कामगारांचे स्वातंत्र्य वेगळे होते. "मुंबईत सातारा जिल्हा राष्ट्रीय संघ स्थापन करून तुफान सेना, निर्माण करण्याचा निर्णय घेतला होता. 'सातारा जिल्हा राष्ट्रीय कामगार संघ' या नावाने मुंबईमध्ये कार्य करु लागला. नाना पाटील यांचे प्रतिनिधी कॅप्टन ज्ञानोबा जाधव या विभागाचे काम पहात होते."[१५]

"डिसेंबर १९४५ साली मुंबईच्या विशाल रस्त्यावर चाळीस हजारांच्यावर संख्येने संचलन करणारा स्वातंत्र्यवादी "युवक कामगार" लढत होता. मुंबईमध्ये राष्ट्रवादी कामगारांचा दबदबा तयार झाला. भारतात मुंबईसारख्या आद्य कामगार नगरीत कामगार जागृत होऊन राष्ट्रीय मिल मजदूर संघाचा पाया घातला." [१६]

सांगली-सातारा भागातील पुढारी व कार्यकर्ते यांची मिटींग या चळवळी-च्या काळातच मुंबईमध्ये भरली. त्यामध्ये असे ठरले की, गावाकडील चळवळीतील पोलिसांचे वॉरंट असलेले लोक मुंबईत असरा घेण्याकरिता येतात. त्याना आसरा देण्यासाठी मुंबईमध्ये "सातारा जिल्हा राष्ट्रीय संघ" नावाची संघटना स्थापन झाली. दोन वर्षात या संघटनेने सहा हजार सभासद केले. ही संघटना मुंबईत फार मोठी केली होती. "या संघटनेचे काम जिल्ह्यातून आलेल्या कार्यकर्त्यांना आश्रय देणे, मुंबईत कार्यकर्ते तयार करणे, सर्वांना बौध्दिक देणे, सत्यशोधकाचे वर्ग चालविणे, इंग्रज सरकारविरुध्द चळवळ करणे असे कार्य सुरु होते. श्री.नाना पाटील यांचा गौरव मुंबईमध्ये फार मोठा केला होता." [१७]

"सातारा जिल्हा राष्ट्रीय संघाची मुंबईत फार ताकत वाढली होती. सातारच्या प्रतिसरकारचा तो एक भागच बनला होता. प्रतिसरकारची मुंबईतील शाखाच असं वातावरण तयार झालेले होते." १८

ग्रामराज्याचा प्रयोग -

सातारा प्रतिसरकारने गावोगावी स्थापन केलेली ग्रामराज्ये म्हणजे प्रतिसरकार चळवळीचे प्रशासकीय स्वरूप होते. आपल्या प्रदेशातून इंग्रजांची सत्ता नष्ट करावयाची तर आपली सत्ता निर्माण व्हायला हवी. त्याचबरोबर आपले शासन निर्माण व्हायला पाहिजे. या भूमिकेतूनच प्रतिसरकारची स्थापना झाली होती. प्रत्येक गावोगावी यापूर्वीच राष्ट्रसेवादले तयार झाली होती. जेथे नव्हती तेथे ती तयार केली गेली. शेकडो तरुण हाताशी धरुन प्रत्येक गांवी न्यायदान कमिटया स्थापन करण्यात आल्या आणि त्यांच्या मदतीने ग्रामराज्याचा प्रयोग राबविण्यात आला. गावोगावचे गुंड, पोलिसांचे खबरे, जुलमी वतनदार व सरंजामदार, दरोडेखोर यांचा बंदोबस्त करण्यासाठी प्रतिसरकारच्या तुफानसेनेचे सरसेनापती जी.डी. उर्फ बापूसाहेब लाड यांच्या नेतृत्त्वाखाली तुफानसेना निर्माण केली गेली. या तुफानसेनेनेच दरोडेखोरांची एकेक टोळी वेचून नाहीशी केली. "गुंडपुंडांना व पोलिस खब-यांना पत्र्या लावल्या. लावल्या जुलमी सावकारांची गाठवावरुन धिंड काढली. सरकारधार्जिण्या मंडळींच्या मनात तुफान सेनेने दहशत निर्माण केली. पण ग्रामराज्यातील सामान्य माणूस दरोडेखोर व गुंड यांच्या भीतीपासून मुक्त केला होता. जनतेला हे प्रतिसरकार प्रतिशासन देणारे आपले सरकार वाटू लागले. गुंडांना पत्र्या लावणारे सरकार जनमानसात "पत्रिसरकार" म्हणून प्रसिध्द होते."१९

ग्रामराज्याच्या चौकटीत गावोगावी स्थापन झालेल्या न्यायदान कमिटयांना अनेक गरीब, नाडलेल्या शेतक-यांवरील अन्यायांचे निवारण करुन न्याय दिला. स्त्रियांच्यावर अत्याचार करणा-यांना जबर शासन दिले. दारु

गाळण्याचे व विक्रीचे उद्योग बंद पाडले. याशिवाय ग्रामराज्याने अनेक विधायक कार्यक्रम हाती घेऊन राबविले. ग्रामसफाई, खादीप्रसार, साक्षरता-प्रसार, दारूबंदी, जुगारबंदी, हुंडाबंदी, गांधीलग्न प्रचार,अस्पृश्यता निवारण इत्यादी विधायक कार्यक्रमांनी ग्रामराज्य केवळ "स्वराज्य" न राहता सुराज्य बनले होते. श्री. नाना पाटील या प्रसंगी म्हणाले होते की, "साताऱ्याच्या जागृत जनतेने स्वयंपूर्ण असा जो स्वावलंबनाचा मार्ग पत्करला त्यातून ग्राम-राज्याच्या प्रस्थापनेचा एक राजकीय सिध्दांत हस्तगत झाला होता." [२०]

<u>काँग्रेसचा त्याग व शेतकरी कामगार पक्षाची स्थापना -</u>

१९४२ च्या "चलेजाव" आंदोलनात नाना पाटलांनी केलेल्या कार्याला देशभर प्रसिध्दी मिळाली. त्यांचा प्रतिसरकारचा प्रयोग लोकांच्या औत्सु-क्याचा विषय झाला. नाना पाटील व त्यांचे सहकारी भूमिगत अवस्था संपवून प्रकट झाल्यावर महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी त्यांचे अपूर्व सत्कार-सोहळे आयोजित करण्यात आले होते. नाना पाटलांच्या नावाभोवती तर मध्ययुगीन काळातील एखाद्या पराक्रमी योध्याप्रमाणे अद्भूत रम्यतेचे वलयच तयार झाले होते. याच काळात जनतेने त्यांना "क्रांतिसिंह" ही पदवी बहाल केली.

याचवेळी महाराष्ट्रातील काँग्रेस संघटनेत वेगळेच राजकारण खेळले जाऊ लागले. १९४५ च्या जुलै महिन्यात इंग्लंडमध्ये ॲटली यांच्या नेतृत्त्वाखाली मजूर पक्षाचे सरकार सत्तेवर आल्यानंतर भारताला लवकरच स्वातंत्र्य मिळणार हे स्पष्ट झाले होते. त्यामुळे काँग्रेस संघटनेत सत्तास्पर्धेच्या राजकारणाला जोर चढला होता. महाराष्ट्रातील काँग्रेस संघटनेची सुत्रे यावेळी देव, देवगिरीकर यांच्या गांधीवादी गटाच्या हाती होती. १९४६ च्या मार्च महिन्यात मुंबई प्रांताच्या कायदेमंडळाच्या निवडणूका होऊन त्यात काँग्रेस पक्षाला बहुमत मिळाले आणि बाळासाहेब खेर यांची पुन्हा मुख्यमंत्री म्हणून निवड झाली.

शंकरराव देव व बाळासाहेब खेर यांना काँग्रेस पक्षातील बहुजन समाजाच्या वाढत्याप्रभावाबद्दल असूया वाटत होती. सातान्याचे प्रतिसरकार व त्यांचे नेते श्री. नाना पाटील यांच्याविषयीही या नेत्यांच्या मनात आकस होता. "खेर मंत्रिमंडळाने शेतकरी, कामगार वर्गाच्या हिताविरोधी स्विकारलेली धोरणे काँग्रेसमधील बहुजन समाजाच्या नेत्यांना मान्य नव्हती. त्यामुळे केशवराव जेधे, शंकरराव मोरे, तुळशीदास जाधव, नाना पाटील इत्यादी नेत्यांनी ११ सप्टेंबर १९४६ रोजी काँग्रेस अंतर्गत "शेतकरी कामगार संघ" स्थापन करण्याचा निर्णय घेतला. केशवराव जेधे व नाना पाटील यांनी महाराष्ट्रभर दौरे काढून शेतकरी परिषदा भरविल्या आणि शेतकऱ्यांना जागृत करण्याचा प्रयत्न चालविला." [२१]

१९४८ च्या एप्रिल महिन्यात मुंबई येथे अखिल भारतीय काँग्रेस समितीची बैठक झाली. या बैठकित काँग्रेस अंतर्गत स्वतंत्र घटना व कार्यक्रम असलेले उपपक्ष किंवा गट यांना काम करता येणार नाही. अशा अर्थाची घटना दुरूस्ती करण्यात आली. त्यामुळे शेतकरी कामगार संघाच्यानेत्यांपुढे संघ विसर्जित करणे किंवा काँग्रेसच्याबाहेर पडणे असे दोन पर्याय राहिले. परंतु या नेत्यांनी काँग्रेस पक्ष शेतकरी व कामगार यांच्या हिताचे रक्षण करू शकणार नाही असे सांगून काँग्रेसमधून बाहेर पडण्याचा मनोदय जाहीर केला. "केशवराव जेधे, शंकरराव मोरे वगैरे नेत्यांनी १३ जून १९४८ रोजी नव्या शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली. या नेत्याबरोबर श्री. नाना पाटीलही नव्या पक्षात दाखल झाले." [२२]

## मराठवाडा-विदर्भ जागृती दौरा -

१९४८ साली हैद्राबादमध्ये रझाकाराचे बंड झाले. हे राज्य मुसलमानांचे आहे ते आम्ही पाकिस्तानाला जोडू असे रझाकारांचे म्हणणे होते. तेथील निजामाने स्थापन केलेल्या निमलष्करी संघटनेचे प्रमुख कासीम यांनी मुस्लिम

रझवी लोकांना हिंदूची दुकाने लुटणे, खून करणे, स्त्रियांच्यावर बलात्कार करण्यास प्रोत्साहन दिले. हिंदु-विरोधी विषारी प्रचार केला. भारतात सामील होण्यास नकार दिला. त्यावरुन चळवळ सुरु झाली. "हे आंदोलन मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात झाले. मराठवाड्यातील रझाकार विरोधी चळवळीतील एक पुढारी श्री. आण्णासाहेब गव्हाणे होते. सातारा प्रति-सरकारचे नेते श्री. नाना पाटील आणि तुफान सैनिक या चळवळीत चांगले लढले." २३

सातारा चळवळीत सरंजामशाहीविरोधी केलेले कामच मराठवाड्यात केले. मराठवाड्यात शेतकरी संघाचे नांव होऊ लागले होते. मराठवाड्याभोवती शेगांव, शेबाळ, पिंपरी, अमरखेड, बार्शी येथे सैनिक शिबिरे, प्रबोधन झालेली होती. "नाना पाटील, जी.डी. लाड यांना मराठवाड्यातील दौरा यशस्वी करण्यासाठी उध्दवराव पाटील, आण्णासाहेब गव्हाणे, डॉ. पंजाबराव देशमुख यांनी खूप मोठी मदत केली." २४

महाराष्ट्रातील छोटया-मोठया गांव, नगर आणि शहरातून अनेक सत्कार समारंभ झाल्यानंतर आक्टोबर, नोव्हेंबर १९४६ मध्ये डॉ. पंजाबराव देशमुख यांनी विदर्भामध्ये नाना पाटील व त्यांच्या सहका-यांचे सरकार-समारंभ आयोजित केले होते.

"अमरावती, बुलढाणा, यवतमाळ व अकोला या जिल्ह्याच्या प्रमुख शहरातून सर्व विदर्भात अनेक कार्यक्रम पार पाडले. यावेळी नाना पाटील यांना विदर्भात भाषणबंदी होती. त्यामुळे लोकांच्यात सरकारबद्दल चीड निर्माण झाली होती. नाना पाटील व त्यांचे सहका-यांना लोक पाहण्यासाठी गर्दी करित असत. हे सत्कार समारंभा पाहून महाराष्ट्राच्या राजकारणात वैचारिक संघर्ष सुरु झाला होता." २५

१९४७ च्या जानेवारीपासून नाना पाटील यांच्या सभा विदर्भात पुन्हा झाल्या. त्यात भाषणाचा विषय असा होता की, "स्वातंत्र्याच्या प्रवेश-

दारावरील शेतकरी व शेती" त्यांची मुख्य टीका नफेखोर, साठेबाज व्यापारी, भांडवलदार, गैरहजर जमीनमालक, अशांवर होती. या सभांना शेतकरी मनापासून साथ देत होता.

१९४८ च्या नोव्हेंबर-डिसेंबर मध्ये खानदेश मध्ये दौरा नाना पाटील यांचा यशस्वी झाला. प्रथम प्रश्चिम खानदेश, पूर्व खानदेश, नासिक व अहमदनगर जिल्ह्यात कार्यक्रम झाला. धुळे, शिंरखेडा, शिरपूर, नंदुरबार, तळोदे, पाचोरा, एरंडगाव, अमळनेर, जळगांव, चाळीसगांव, इत्यादी ठिकाणी शेकडो सभा झाल्या.

शेतकरी कामगार पक्षाच्या स्थापनेनंतर महाराष्ट्रात ह्या पक्षाचे कार्य वाढविण्यासाठी नानांनी आपल्या नित्याच्या बाण्यानुसार अहोरात्र परिश्रम घेतले. केशवराव जेधे यांच्या समवेत महाराष्ट्राच्या अनेक भागांत दौरे काढले आणि खेड्यापाड्यातील सर्वसामान्य जनतेला पक्षाची भूमिका समजावून सांगितली. शेतक-यांच्या भाषेत त्यांच्याशी संवाद साधणारा व त्यांच्या अंत:करणे काबीज करणारा नाना पाटलांसारखा नेता शेतकरी कामगार पक्षास मिळाल्यामुळे ग्रामीण भागात पक्षाचे कार्य वाढविण्याचा व पक्षप्रचाराचा मुख्य भार नाना पाटलांनीच वाहिला.

शेतकरी कामगार पक्षातील मतभेद -

शेतकरी कामगार पक्षाला सुरुवातीला महाराष्ट्रात चांगला प्रतिसाद लाभला. श्री. नाना पाटील, केशवराव जेधे, शंकरराव मोरे, तुळशीदास जाधव, माधवराव बागल यांसारखे बहुजन समाजाचे मान्यवर नेते या पक्षात सामील झाल्यामुळे महाराष्ट्रातील बहुजनसमाजावर पक्षाची चांगली छाप पडली.

तथापी, शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्यांमधील मतभेद लवकरच उघड होऊ लागले. १९५० च्या सप्टेंबर महिन्यात पक्षांचे अधिवेशन वाठार या

ठिकाणी भरविण्यात आले. या अधिवेशनानंतर "नवजीवन संघटना" ही डाव्या विचारांची संघटना पक्षात सामील झाली. पण त्यावरुन पक्षातील शंकरराव मोरे व दत्ता देशमुख या दोन नेत्यांत संघर्ष निर्माण झाला. नवजीवन संघटनेचा पाठिंबा दत्ता देशमुख यांना मिळाल्यामुळे शंकरराव मोरे यांनी दत्ता देशमुखांविरुद्ध संघर्षाचा पवित्रा घेतला. त्यांनी नवजीवन संघटनेला पक्षाबाहेर घालवून देण्याचा प्रयत्न सुरु केला.

या संघर्षात श्री. नाना पाटील, दत्ता देशमुखांच्या बाजूने उभे राहिले. शंकराव मोरे यांच्या स्वयंकेंद्रित वृत्तीमुळे शेतकरी कामगार पक्ष फुटीच्या उंबरठयावर उभा राहिला. पक्षातील काही नेत्यांनी दोन्ही गटांत तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न केला. पण यात यश आले नाही. "शेवटी दत्ता देशमुख, नाना पाटील, काकासाहेब वाघ, व्ही.एन्. पाटील इत्यादी नेत्यांनी शेतकरी कामगार पक्षाचा त्याग करुन "कामगार किसान पक्षाची" स्थापना आक्टोबर १९५१ साली केली." [२६]

नाना पाटील यांचा कम्युनिष्ट पक्षात प्रवेश -

"कामगार किसान पक्ष" महाराष्ट्रात विशेष मूळ धरु शकला नाही. १९५२ च्या निवडणूकीत या पक्षाने काही उमेदवार उभे केले होते. परंतु "कामगार किसान पक्षा"ची महाराष्ट्रात सर्वत्र वाताहात झाली. शेतकरी कामगार पक्षालाही अपेक्षेप्रमाणे यश मिळाले नाही. "मुंबई राज्यात शे.का. पक्षाला लोकसभेची एक आणि विधान सभेच्या तेरा जागा मिळाल्या, मराठवाड्यामध्ये लोकसभेची एक आणि विधान सभेच्या दहा जागा मिळाल्या. आणि विदर्भामध्ये विधानसभेच्या दोन जागा मिळाल्या. म्हणजेच या पक्षाला महाराष्ट्रात लोकसभेच्या दोन आणि विधानसभेच्या पंचवीस जागा मिळाल्या." [२७] नाना पाटील जर या पक्षाबरोबर असते तर जास्त दैदिप्यमान यश मिळाले असते.

कामगार किसान पक्षाला महाराष्ट्राच्या राजकारणात फारसे भवितव्य नाही ही गोष्ट निवडणूक निकालाने स्पष्ट झाली. पक्षाच्या काही नेत्यांनी "लाल निशाण गट" या नावाने वेगळाच पक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेतला. पण श्री. नाना पाटील यांनी भारतीय कम्युनिस्ट पक्षात सामील होण्याचे ठरविले आणि त्यानुसार त्यांनी १९५३ मध्ये भारतीय कम्युनिष्ठ पक्षात प्रवेश केला." २८

महाराष्ट्राच्या ग्रामीण जनतेत श्री. नाना पाटील यांना जे स्थान लाभले होते, त्याची योग्य ती दखल भारतीय कम्युनिष्ट पक्षाने घेतली म्हणूनच इ.स. १९५४ मध्ये त्यांची महाराष्ट्र किसान सभेच्या अध्यक्षापदी तसेच भारतीय किसान सभेच्या उपाध्यक्षापदी निवड करण्यात आली.

१९५५ च्या मे महिन्यात नाना पाटलांना भारतीय किसान सभेच्या अध्यक्षापदाचा अत्युच्च बहुमान प्राप्त झाला. पुढे त्याच वर्षीच्या ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात सोव्हिएट युनियनला भेट देणा-या किसान प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्त्वही त्यांनी केले होते. सोव्हिएत जनतेच्या विशेषत: तेथील शेतकरी वर्गाच्या जीवनपध्दतीने त्यांना खूप प्रभावित केले होते.

श्री. नाना पाटील यांनी स्वातंत्र्यानंतर समाजाचे फार मोठे कार्य केलेले होते. ते अखेरपर्यंत शांत बसले नाहीत. विविध लढयाचे नेतृत्त्व केले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात जनजागृती करण्याचे कार्य नाना पाटील यांनी करुन लढयाचे नेतृत्त्व केले, पडेल ती किंमत त्यासाठी मोजली पण न्याय मिळविण्यात आघाडीवर राहिले.

नानांनी सतत श्रमजीवी जनतेच्या संघर्षासाठी प्रयत्न केला. शेतकरी, शेतमजूर, कामगार, यांच्या न्याय मागण्यांचा पाठपुरावा केला. खंडकरी शेतक-यांचे लढे नाना पाटील यांच्यामुळेच यशस्वी झाले. नाना पाटील स्वत: शेतकरी असल्यामुळे शेवटपर्यंत शेतक-यांच्या मालाला भाव बांधून दिले पाहिजेत यासाठी लढले.

भारताच्या स्वातंत्र्यानंतरही स्वराज्याचे सुराज्य निर्माण करण्यासाठी नाना पाटील यानी प्रयत्न केले. शेतकरी, कामगार, शेतमजूर आणि श्रमिकांच्या हितासाठी शेवटपर्यंत आपल्या सहका-यांच्या सहकार्यावर विविध संघटना स्थापन करूनत्यानी लढे दिले. नाना पाटील यांचे ६ डिसेंबर १९७६ रोजी दु:खद निधन मिरज येथे झाले.

.......

## प्रकरण दुसरे

## संदर्भग्रंथ


१) पाटील, उत्तमराव/लाड, अप्पासाहेब - "क्रांतिवीर नाना पाटील" पृ. १३.

२) कित्ता - पृ. २२.

३) कित्ता - पृ. २४.

४) ठोके, को.नि. - "श्रमिकांचा कैवारी", पृ. २९.

५) पाटील, उत्तमराव/लाड, अप्पासाहेब - "क्रांतिवीर नाना पाटील" पृ. २५.

६) कित्ता - पृ. ३६.

७) कित्ता - पृ. ३९.

८) पाटील, उत्तमराव/लाड, अप्पासाहेब - "क्रांतिवीर नाना पाटील" पृ. ४५.

९) कित्ता - पृ. ४७.

१०) ठोके, मो.नि. - "श्रमिकांचा कैवारी", पृ. ८१ व ८२.

११) टिल्लू, पांडुरंग श्रीधर - "सातारचा सिंह", पृ. २१ व २२.

१२) कित्ता - पृ. २१

१३) पवार, जयसिंगराव (संपा.) - "क्रांतिसिंह नाना पाटील", पृ. १४

१४) कित्ता - पृ. १५.

१५) जाधव, अंकुश - "सोनहिरा", पृ. १४-१५.

१६) किता - पृ. १५.

१७) किता - पृ. २७ व २८.

१८) किता - पृ. २९.

१९) पवार, जयसिंगराव (संपा.)- "क्रांतिसिंह नाना पाटील", पृ. १२.

२०) पाटील, उत्तमराव/लाड, अप्पासाहेब -"क्रांतिवीर नाना पाटील", पृ. १५१.

२१) पाटील, विलास - "क्रांतिसिंह नाना पाटील", पृ. १३२.

२२) किता - पृ. १३७.

२३) लाड, जी.डी. - "पेटलेले पारतंत्र व धुमसते स्वातंत्र्य" पृ. १८७.

२४) किता - पृ. १८९.

२५) किता - पृ. १९५.

२६) पाटील, विलास - "क्रांतिसिंह नाना पाटील", पृ. १४१.

२७) फडके य.दि. - "केशवराव जेधे", पृ. २२१ व २२२.

२८) पाटील, विलास - "क्रांतिसिंह नाना पाटील", पृ. १४२.


.......